# ARTS COMMERCE COLLEGE, VADUJ.

Student Name - Bagal Pravin sadashiv.

Roll No. - 405

Class - B. Com III

Teacher's Name - Khot C. M.

Year - 2017 - 18

Sub - Co-operation

Scanned with CamScanner

ग्रामीण विकासातील सहकारी साखर कारखान्यातील भूमिका स्पष्ट करा.

भारत व महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत सहकारी साखर कारखान्यांना विशेष महत्त्व आहे. भारतात कापड उद्योगानंतर साखर कारखान्यांचा क्रम लागतो. आज अखेर महाराष्ट्रात २०२ साखर कारखाने काम करीत आहेत. देशाच्या व राज्याच्या ग्रामीण भागातील विकासाची केंद्रे म्हणून सहकारी साखर कारखान्यांकडे पाहिले जाते. ग्रामीण विकासाच्या कार्यात सहकारी साखर कारखाने पुढील प्रमाणे भूमिका पार पाडतात.

अ) आर्थिक विकासातील भूमिका किंवा सहभाग =

1) ऊस लागवड व उत्पादन वाढ =

सहकारी साखर कारखान्यांचे कार्य नियमित व पुरेसा ऊस पुरवठ्यावर अवलंबून असल्याने साखर कारखान्यांना प्रथम ग्रामीण भागात ऊसाच्या लागवडीखालील क्षेत्र वाढवणे. व दर हेक्टरी ऊस उत्पादनात वाढ करण्यावर भर द्यावा लागतो. यासाठी साखर कारखाने परीक्षण करणे, बियाणांचा खेतांचा पुरवठा करणे, ऊस तोडणीचे वेळापत्रक ठरविणे इ. कार्ये करित असतात.

2] औद्योगिक व व्यावसायिक उद्योगांना उत्तेजन =

ग्रामीण भागात साखर कारखान्यांचा स्थापनेमुळे त्या भागात औद्योगिक व व्यावसायिक उपक्रम स्थापन होण्यास उत्तेजन मिळाले आहे. विशेष कृषी व्यवसायासाठी उपयुक्त यंत्रे व अवजारांची निर्मिती, रसायन निर्मिती खत उत्पादन सुरू करतात.

Scanned with CamScanner

3] ऊस संशोधन व विकासात सहभाग —

नियमितपणे पुरेशा प्रमाणात ऊसाचा पुरवठा व्हावा यासाठी साखर कारखान्यांना प्रयत्नशील आणि प्रगतशील रहावे लागते यासाठी साखर कारखान्यातील कर्मचारी भरती करावी त्यामुळे मोठ्या प्रमाणात विकास होण्यास मदत होते.

4] ग्रामीण रस्ते बांधणी -

साखर कारखाने ग्रामीण भागात असल्याने ग्रामीण भागात रस्त्यांचे जाळे तयार करणे शेतीपासून मुख्य रस्त्याला जोडणारे व त्यांची प्रत्येक वर्षी दुरूस्ती करणे हे साखर कारखान्यांना महत्त्वाचे करावे लागते. त्यामुळे शेतीपासून कारखान्यापर्यंत ऊसाची वाहतूक सहज करता येते.

5] काटकसर व बचतीच्या सवयी जोपासणे —

सहकारी साखर कारखान्यांमुळे ग्रामीण भागातील ऊस उत्पादक व बिगर ऊस उत्पादक यांच्या प्राप्तीच्या प्रमाणात वाढ होण्यास मदत झाली आहे. तसेच ग्रामीण भागात कार्य करणाऱ्या राष्ट्रीयकृत बँकाच्या शाखा ग्रामीण विकास बँका व पतसंस्था ग्रामीण जनतेला काटकसर व बचतीच्या सवय लावण्यास पुरेशा झाल्या आहेत.

6] रोजगारात वाढ —

साखर कारखाने व त्यांच्या इतर प्रकल्पांमुळे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारामुळे मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. कारखान्याजवळ स्थापन होणाऱ्या अन्य उद्योग व सेवा तसेच बाजारपेठांमुळे मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे.

Scanned with CamScanner

ब] सामाजिक विकासातील भूमिका किंवा सहभाग –

1] शैक्षणिक विकास –

बहुतेक साखर कारखान्यांतील आपल्या-कुडील नफ्यांचा भाग शैक्षणिक कार्यासाठी त्यातून प्राथमिक शिक्षणापासून पदवीपर्यंतच्या शिक्षणासाठी शैक्षणिक संस्था स्थापन केल्या आहेत. महाराष्ट्रातील साखर कारखान्यांनी इंजिनिअरींग व मेडीकल स्थापन केले आहेत. तसेच तांत्रिक संस्था सुरू केल्या आहेत.

2] वैद्यकीय सुविधा –

महाराष्ट्रातील बहुतेक साखर कारखान्यांनी अनेक प्राथमिक स्वास्थ केंद्रे चालवली असून ग्रामीण जनतेला आवश्यक सुविधा अल्प खर्चात पुरवल्या जातात. काही कारखान्यांनी स्वत: मोठी हॉस्पिटल उभारली केली आहेत.

3] गृहनिर्माण –

साखर कारखान्यांमध्ये काम करणारे कामगार व इतर सेवकांना कारखान्यांद्वारे निवासाच्या सोयी पुरवल्या जातात. तसेच कारखान्याद्वारे २० कलमी कार्यक्रमाअंतर्गत ग्रामीण भागातील मागासवर्गीय लोकांना मोफत घरे पुरविली आहेत.

4] वीज व पाणीपुरवठा –

शेतीला नियमित पाणीपुरवठा करता यावा म्हणून कारखाने शेतकऱ्यांना लघु पाणीपुरवठा आर्थिक मदत देत असतात. विहिरी खोदणे पाणी पुरवठ्याच्या इतर सोयी कारखान्यांनी स्वत:ची यंत्रसामग्री दिली आहे. तसेच सहकारी कारखान्यांमार्फत विजेच्या सोयी उपलब्ध करून दिल्या आहेत.

Scanned with CamScanner

Page:
Date: / /

5] सांस्कृतिक विकासास मदत -

महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखाने आपल्या कार्यक्षेत्रातील गावांमध्ये कार्यरत असणारे ग्रंथालय, नाटक मंडळे व सांस्कृतिक व तरुणमंडळे यांना आर्थिक मदत करतात.

6] कामगारांचा व्यवस्थापनात सहभाग -

सहकारी साखर कारखान्यांनी कामगार व्यवस्थापनात सहभाग करून घेणे हे सर्वात महत्त्वाचे तत्त्व मान्य केले आहे.

Scanned with CamScanner

महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांच्या समस्या / दोष पुढीलप्रमाणे सांगता येतील.

1] अपुरा ऊस पुरवठा -

महाराष्ट्रातील काही साखर कारखान्यांच्या क्षेत्रात पुरेसा ऊस उपलब्ध नाही. त्यामुळे या कारखान्यांना हंगामात ऊसाची टंचाई जाणवते अशा हंगामात 165 दिवस करू शकत नाहीत. तसेच पावसाच्या लहरीपणामुळे ऊसाचे क्षेत्र कमी होत असल्याचे दिसून येते.

2] ऊसाखालील क्षेत्रात बदल -

नगदी पिक म्हणून साखर कारखाने क्षेत्रातील शेतकरी लावतात. परंतु ऊसाला किंमत नाही त्यामुळे शेतकरी ऊसाऐवजी इतर पिकांकडे वळतात. कारखान्याद्वारे ऊसाची बिले वर्षानुवर्षे दिली जात नाहीत. तसेच ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान होते.

3] ऊस लागवड खर्चात वाढ -

ऊस बियाणे, खते, कीटकनाशके यांच्या किंमतीत सातत्याने होणाऱ्या वाढीस ऊसाच्या लागवडीचा खर्च दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे शेतकरी ऊसाऐवजी इतर पिकांकडे वळत आहेत.

4] क्षमतेचा अपुरा वापर -

सहकारी कारखाने ऊसाच्या अपुऱ्यापणामुळे ऊस गाळप क्षमतेचा पूर्ण वापर करू शकत नाहीत. ऊसाचे उत्पादन जास्त पाण्यावर अवलंबून असल्याने पुरेसा ऊस मिळू शकत नाही. त्यामुळे कारखाने पूर्ण क्षमतेने गाळप करू शकत नाहीत.

Scanned with CamScanner

5) खर्चात वाढ -
साखर कारखाने उत्पादन खर्चात दिवसेंदिवस वाढ होत आहे. कमी गाळप झाल्यास खर्चाचे प्रमाण वाढते. त्यामुळे साखरेचा उत्पादनखर्च परवडत नाही.

6) कर्मचाऱ्यांची आर्थिक संख्या -
साखर कारखान्यांच्या गाळप क्षमतेवर कारखान्यास लागणाऱ्या कायम व हंगामी कामगारांची संख्या अवलंबून असते. परंतू सर्व साखर कारखाने आढळते. त्यामुळे प्रशासकीय खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ होते. त्यामुळे राजकीय व सामाजिक दबावामुळे कारखान्यात अधिक कामगारांची भरती केली जाते.

7) अकार्यक्षम कामगार -
सहकारी साखर कारखान्यांची प्रशासकीय सेवक व इतर सेवक वर्ग हा पुरेसा नसल्याने त्याबाबत टिका केली जाते. त्यांच्या अकार्यक्षमतेचा परिणाम प्रशासनावर होत असतो.

8) कर्जबाजारीपणा -
महाराष्ट्रातील कारखाने कर्जबाजारी आहेत. त्यांच्या मालमत्तेच्या किंमतीपेक्षा कितीतरी अधिक कर्ज कारखान्यांनी घेतले आहे. त्यांना ते भरता आले नाही.

9) रोगराई -
महाराष्ट्रातील बहुतेक भागात ऊसावर मावा या रोगाचा प्रदुर्भाव मोठ्या प्रमाणात झाल्याने ऊसाचे नुकसान होऊन त्यामुळे कारखान्यांना ऊसाचा पुरवठा कमी झाला आहे.

Scanned with CamScanner

10] राजकारणाचा प्रभाव -

अनेक साखर कारखान्यांवर राजकीय पक्षांचा प्रभाव असल्याचे दिसते. त्यामुळे राजकीय नेतृत्व या माध्यमातून निर्माण होत असल्याचे दिसून येते. राजकीय महत्त्व वादविण्यासाठी मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यातून पैसा व वेळेचा अपव्यय होवून कारखाने उद्देशापासून जात असल्याचे दिसून येते.

Scanned with CamScanner